आरोग्य सेवा

जाक्र/जिप्रकें/एएमसी/दरपत्रमागविणे/१३१ /२०२५
जिल्हा प्रशिक्षण केंद्र,जि.प.सांगली.
दिनांकः- ०२ /०४/२०२५

प्रति,

..........................................

..........................................

**विषय :- स्टेशनरी पुरवठा करणेसाठी दरपत्रक पाठविणे बाबत.........**

आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,सांगली अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण केंद्र सांगली व जिल्हा शल्य चिकित्सक, पवपाशारु आवार, सांगली येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये शासनाच्या आदेशानुसार आरोग्य विषयक प्रशिक्षणे घेतली जातात. सदर प्रशिक्षणार्थीना व कार्यालयीन कामकाजासाठी स्टेशनरीची आवश्यकता असते.

त्यासाठी स्टेशनरी पुरवठा करणेबाबत सोबत जोडलेल्या स्टेशनरी यादीतील स्टेशनरी अटी व शर्तीचे अधिन राहून आपणाकडून ई-कोटेशन द्वारे दरपत्रके मागविण्यात येत आहेत सदर दरपत्रके सिलबंद लखोटयामधून मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली या कार्यालयास दि.०३./०४/२०२५ रोजी पासून दिनांक १०/०४/२०२५ अखेर सायंकाळी ०५.०० पर्यंत सादर करणेत यावे.उशीरा येणारे दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ.विजयकुमार वाघ)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,सांगली

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः-**

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सांगली.
२) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.सांगली.
३) मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,कोल्हापूर.

# महाराष्ट्र शासन
## आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,सांगली

### स्टेशनरी ई-कोटेशन प्रक्रीया अटी व शर्ती २०२५-२६

१) संपूर्ण **ई-कोटेशन** प्रक्रीयेची online izfl/nh Website Document Upload From (WDUF) द्वारे राबविण्यात आली आहे.

२) **ई-कोटेशन** सुपुर्द करताना खालील गोष्टीचा अंतर्भाव असणे अनिवार्य आहे

अ) व्यवसाय नोंदणी/नुतनीकरण प्रमाणपत्र.

ब) पॅनकार्ड व आधार कार्ड झेरॉक्स प्रत द्यावी (बचतगट असल्यास बचत गटाच्या नावाने पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

क) पूर्ण भरलेला व स्वाक्षांकित केलेला ई-काटेशन फॉर्म

३) पुरवठादार यांनी प्रत्येक बाबीचे दर हे विहीत ई-काटेशन फॉर्म मध्येच सादरी करणेचे आहेत.

४) **ई-कोटेशन** फॉर्म व दरपत्रके मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद सांगली याचे कार्यालयात जमा करणेची आहेत व ती मुदत संपलेवर तेथेच उघडणेत येणार आहेत.

५) ज्याप्रमाणे स्टेशनरीची मागणी असेल त्याप्रमाणे स्टेशनरी पुरवठा करणेचा आहे.

६) दरपत्रकामधील दर सर्व करांसहीत नमूद करणेचे आहेत. तसेच नमुद केलेले **दर प्रति १ नग** देणेचा असून ई-काटेशन फॉर्ममध्ये सामाविष्ट असलेल्या सर्व बाबींच्या एकूण मूल्याच्या आधारे न्यूनतम दर निश्चित करणेत येईल.

७) स्टेशनरी साहीत्य इत्यादीचा आवश्यकतेनुसार पुरवठा करावयाचा असलेने जिल्हा स्तरावरुन दर निश्चित करणेकामी **ई-कोटेशन** प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

८) प्रशिक्षणासाठी दिलेल्या वेळेत व दिलेल्या मागणीप्रमाणे स्टेशनरीचा पुरवठा प्रशिक्षणाचे ठिकाणी करणेचा आहे.

९) प्रशिक्षणार्थी व कार्यालय यांना पुरवठा करावयाची स्टेशनरी यांचा दर्जा सातत्याने उत्तम राखणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थीनीं दर्जाबाबत लेखी तक्रार केल्यास व समितीने त्याची खात्री केलेस करार कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

१०) **ई-कोटेशन** कोणतेही कारण न देता मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकारी मा. अध्यक्ष जिल्हास्तरीय खरेदी समिती आरोग्य विभाग जि.प.सांगलीकडे राहतील.

११) प्रत्येक प्रशिक्षणाच्या पूर्वी आगवू कल्पना दिली जाईल त्यानुसार स्टेशनरी व इतर साहीत्य वेळेत पुरवठा करावयाचे आहे.

१२) जिल्हा स्तरीच ख़रेदी समिती अध्यक्ष्य /सदस्य अचानक भेट देऊन स्टेशनरीचा दर्जा तपासून पाहतील.

१३) उपस्थिती पत्रक व कार्यालयास आवश्यक स्टेशनरीच्या आधारे स्टेशनरीचे देयक महीना संपलेनंतर पीएफएमएस प्रणालीव्द्वारे अदा केले जाईल. देयक अदा करतेवेळी शासनाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांनुसार टीडीएस, जीएसटी इ.ची रक्कम मासिक बीलामधून कपात करणेत येईल.

१४) जिल्हा प्रशिक्षण केंद्र,सांगली येथे स्टेशनरी इ.ची सुविधा पुरविणे आवश्यक आहे. सदरसाठी वाहतूकीचा खर्च स्वतंत्र अदा केला जाणार नाही.

१५) सदर स्टेशनरीचा पुरवठा आरोग्य खात्याबरोबरच जिल्हा परिषद सांगली अंतर्गत इतर विभागामधील प्रशिक्षण, सभा, कार्यशाळा, आढावा बैठक, सेमिनार, वर्कशॉप, इ.यांचेसाठी लागू राहील.

१६) काही कारणास्तव मंजूर पुरवठादाराकडून कराराचा भंग झालेस अथवा त्यांनी असमर्थता दर्शविलेस व वरील सर्व अटी व शर्तींचे पालन न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता पुरवठा आदेश रद्द करणेत येईल.

१७) सदरचे दरपत्रक पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षासाठी बंधनकारक राहतील.

१८) **ई-कोटेशन** नामंजूर झाल्यास त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९) सन २०२५-२६ या वर्षातील ई-कोटेशन व दरपत्रक प्रक्रीया पूर्ण होऊन काही कारणास्तव पुढील वर्षाची सदर प्रक्रीया पूर्ण करणेस विलंब लागणार असलेस समितीमार्फत पुरवठादारास मुदतवाढीचे आदेश दिले जातील.

२०) ई-कोटेशन मजकुरात, रक्कमेत वा अन्य कोणत्याही बाबीत बदल झाल्यास तसे शुध्दीपत्रक वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल. त्याकरीता स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही म्हणून निविदा भरावयाच्या अंतिम वेळेपर्यंत तशी शहानिशा संबंधीतांनी करावयाची आहे.

२१) कोणत्याही बाबीसाठी तंटा निर्माण झालेस त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

२२) निम्नस्तर (L१) निविदाधारकाने काम करणेस नकार दिल्यास प्रतिक्षा यादीतील क्र.२ यांना पुरवठा आदेश देण्यात येईल.

**वैद्यकिय अधिकारी**
**जिल्हा प्रशिक्षण केंद्र, सांगली**

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली.**

| स्टेशनरी व इतर साहीत्याची यादी खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | प्रति नग व बॉक्स | दर |
| 1 | लॅमीना फाईल | 1 | |
| 2 | गोट लॅमीना फाईल | 1 | |
| 3 | पोर्ट फोलीओ फाईल | 1 | |
| 4 | पोर्ट फोलीओ फाईल फोरवे | 1 | |
| 5 | रेक्झीन बॅग (१५×१२×४इंच) | 1 | |
| 6 | रेक्झीन बॅग (१८×१२×६इंच) | 1 | |
| 7 | बॉल पेन (०.५) रुपये ५ पर्यंत | 1 | |
| 8 | बॉल पेन (जॉटर रिफील) रुपये १५ ते २५ | 1 | |
| 9 | बॉल पेन (ग्रीप) रुपये १० ते १५ | 1 | |
| 10 | कलर पेन (रेनॉल्ड बोल्ड) | 1 | |
| 11 | कॉन्फरन्स पॅड (२० पाने) | 1 | |
| 12 | कॉन्फरन्स पॅड (४० पाने) | 1 | |
| 13 | स्केच पेन १० नग (मोठ) | 1 | |
| 14 | स्केच पेन १० नग (थिक थिन) | 1 | |
| 15 | मार्कर पेन (पॉइनटेड) | 1 | |
| 16 | मार्कर पेन (मोठा) | 1 | |
| 17 | व्हॉईट बोर्ड मार्कर | 1 | |
| 18 | व्हाईटनर पेन | 1 | |
| 19 | हायलायटर | 1 | |
| 20 | ऑफिस फाईल जाड (लेस) | 1 | |
| 21 | ऑफिस फाईल साधी (पट्‌टी) | 1 | |
| 22 | लेस फाईल | 1 | |
| 23 | ऑफीस बॉक्स फाईल A4 (लहान) | 1 | |
| 24 | ऑफीस बॉक्स फाईल A4 (मोठी) | 1 | |
| 25 | पेन्सील | 1 | |
| 26 | खोड रबर | 1 | |
| 27 | शॉपनर | 1 | |
| 28 | बॅच कव्हर | 1 | |
| 29 | बॅच कव्हर चिमटे | 1 | |
| 30 | आखीव रजिस्टर १ क्वॉयर | 1 | |
| 31 | आखीव रजिस्टर २ क्वॉयर | 1 | |
| 32 | आखीव रजिस्टर ३ क्वॉयर | 1 | |
| 33 | लॉग बुक (पातळ कव्हर)८० पानी | 1 | |
| 34 | लॉग बुक (पातळ कव्हर)१७२ पानी | 1 | |
| 35 | आखीव कागद फुल स्केप १ रिम | 1 | |
| 36 | A4 कागद रिम | 1 | |
| 37 | लिगल कागद रिम | 1 | |
| 38 | कार्ड शिट पेपर फुल साईज | 1 | |
| 39 | सेलो टेप मोठा | 1 | |
| 40 | स्टॅपलर १० नं. | 1 | |
| 41 | स्टॅपलर पीन (१०×१) १ M.(बॉक्स) | 1 | |
| 42 | स्टॅपलर मोठा | 1 | |
| 43 | स्टॅपलर पीन (24X6) 1 M. (बॉक्स) | 1 | |
| 44 | पंचींग मशीन लहान | 1 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | पंचींग मशीन मोठी | 1 | |
| 46 | इंकजेट फोटो पेपर (५० नग) | 1 | |
| 47 | पेपर कटर  मोठा साईज | 1 | |
| 48 | खडू बॉक्स पांढरा | 1 | |
| 49 | खडू बॉक्स रंगीत | 1 | |
| 50 | शाई पॅड मोठा | 1 | |
| 51 | शाई पॅड शाई | 1 | |
| 52 | खडू फळाडस्टर | 1 | |
| 53 | व्हॉईट बोर्ड डस्टर | 1 | |
| 54 | टॅग १ बंडल | 1 | |
| 55 | टाचणी  १ लहान बॉक्स | 1 | |
| 56 | लाकडी पट्टी १ १/२ फुट | 1 | |
| 57 | काचेची पट्टी | 1 | |
| 58 | स्टील पट्टी | 1 | |
| 59 | कार्बन पेपर पेटी | 1 | |
| 60 | लिफाफा 3x9 | 1 | |
| 61 | पेपर चिमटे (बांईडर क्लिप)१ नग 41mm | 1 | |
| | | 61 | |

वैद्यकीय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र,सांगली

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सांगली.